# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

## कुलसचिवांचे कार्यालय

**डॉ. अनिल झेड चिताडे**
**कुलसचिव (प्र.)**
**गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.**

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली –४४२६०५(महा.)
फोनः07132.216554, 223104 फॅक्स : 07132.2
Email : gug.registrar@gmail.com
web: https://www.unigug.ac.in


क्रमांक/गो.वि./१०५९ /२०२१ दिनांक : ३०/११/२०२१

प्रति,

**मा. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व (Non A.I.C.T.E.) महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**
**मा. विभागप्रमुख, विद्यापीठाचे पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**विषय :– माहीती व्यवस्थापण प्रणाली (M.I.S.) उच्च शिक्षण, पुणे संदर्भ वर्ष २०२१–२२ बाबतची माहिती (www.dhemis.maharashtra.gov.in)या संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करण्याबाबत.**

संदर्भः–१) मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/२०२१–२२/१३७९० दिनांक २६.११.२०२१

**महोदय,**

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये विद्यापीठाशी संलग्नित (Non AICTE) महाविद्यालयांना कळविण्यात येते की, M.I.S. **संदर्भ वर्ष २०२१–२२** ( दिनांक ३०/११/२०२१ या दिवसापर्यंतची प्रशासकीय/शैक्षणिक व शैक्षणिकत्तर बाबींची माहीती ) बाबतची माहिती ऑनलाईन सादर करण्याची लिंक दिनांक **०१/१२/२०२१ पासुन सुरू करण्यात येत असुन दिनांक ३१/१२/२०२१ पर्यंत** माहीती ऑनलाईन सादर करावयाची आहे.

त्याअनुषंगाने संदर्भांकित पत्रानुसार माहिती **(www.dhemis.maharashtra.gov.in)** या संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करण्याबाबत कळविलेले आहे. करीता माहीती ऑनलाईन भरून शासनास तसेच विद्यापीठास सहकार्य करावे. सदर माहिती परीपुर्ण व अचुक भरल्याबाबतचे प्राचार्यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र एम.आय.एस./ए.आय.एस.एच.ई. नोडल ऑफिसर श्री. प्रमोद बोरकर (असिस्टंट प्रोग्रॉमर), परिक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग यांचे कडे सादर करावे. माहीती सादर न करणाऱ्या महाविद्यालयांवर संदर्भांकित पत्र क्र. १ मधील पान क्र. २ वरील मुद्दा क्र. ५ नुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

30/11/2021

कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 10573 दि. 29/11/21

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण),
मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१

कार्यालयाचे संकेतस्थळ :- www.dhepune.gov.in कार्यालयीन ई-मेल:-stat.dhepune@nic.in
फोन :- ०२०-२९७०७०९३

क्र.उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/२०२१-२२/ 13790 दिनांक - २६.११.२०२१
26 NOV 2021

प्रति,

१.सहसंचालक (उच्च शिक्षण),
पुणे/मुंबई/नागपूर/अमरावती/औरंगाबाद/कोल्हापूर/सोलापूर/नांदेड/जळगांव/पनवेल.

२.कुलसचिव,
सर्व अकृषी/अभिमत/ स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे,

**विषय - माहिती व्यवस्थापन प्रणाली (DHEMIS) वेबपोर्टलवर सन २०२१-२२ या वर्षाची माहिती नोंदविणेबाबत.**

**संदर्भ - संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/सांख्यिकी/एम.आय.एस/२०२१-२२/१०५८९/ दि. २७.०९.२०२१.**

उच्च शिक्षण संचालनालयाने www.dhemis.maharashtra.gov.in हे एमआयएस माहिती नोंदणीचे वेबपोर्टल विकसित केले आहे. संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व सहसंचालक कार्यालये, विदयापीठे आणि संलग्नित महाविदयालये सन २०१३-१४ पासून हया वेबपोर्टलवर ऑनलाईन पध्दतीनुसार प्रत्येक वर्षाकरीता प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची माहिती नोंदवित आहेत हे आपणांस विदित आहेच.

२. **संचालनालयाकडून सन २०२१-२२ हया वर्षाच्या माहिती नोंदणीची वेबलिंक वरील वेबपोर्टलवर दि.१.१२.२०२१ पासुन उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सन २०२१-२२ करीता सहसंचालक कार्यालये व उच्च शिक्षण संचालनालयाचे अधिनस्त सर्व अकृषी/अभिमत/खाजगी विदयापीठे आणि संलग्नित सर्व महाविदयालयांनी दिनांक ३० नोव्हेंबर २०२१ या संदर्भ दिवसाची प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची माहिती वेबपोर्टलवर नोंदविणे अनिवार्य आहे. माहिती नोंदणीचे काम व त्यानंतर नोंदविलेल्या माहितीची वैधता पडताळणी करुन व आवश्यक तेथे दुरुस्त्या करण्याचे काम सर्व सहसंचालक कार्यालये, विदयापीठे आणि संलग्नित महाविदयालयांनी दिनांक ३१.०१.२०२२ अखेर निश्चितपणे पूर्ण करावयाचे आहे. सन २०२१-२२ च्या माहिती नोंदणीच्या कामाचा अहवाल संचालनालयाकडुन तातडीने शासनाला सादर करावयाचा असल्याने वरील माहिती नोंदणीचे व वैधता पडताळणी करण्याचे काम तातडीने पुर्ण होईल यादृष्टीने सर्व सहसंचालक कार्यालये व विदयापीठांनी कामाचे संनियंत्रण करावे.**

३. सहसंचालक कार्यालयांचे, विभागातील अनुदानित महाविदयालयांवर थेट नियंत्रण असल्यामुळे त्यांनी आपल्या विभागातील अनुदानित महाविदयालयांच्या आणि आपल्या सहसंचालक कार्यालयाच्या एमआयएस माहिती नोंदणीचे काम विहित मुदतीत पूर्ण करुन घ्यावे. विदयापीठांनी आपल्या विदयापीठातील नियुक्त करण्यात आलेल्या एमआयएस नोडल अधिका-यांकडुन आपल्या विदयापीठाचे माहिती नोंदणीचे काम विहित मुदतीत पूर्ण करुन घ्यावे. विदयापीठांशी संलग्नित असलेल्या महाविदयालयातील माहिती नोंदणीबाबत विदयापीठस्तरावरुन स्वतंत्र पत्र, ई-मेल, दूरध्वनीव्दारे संबंधित महाविदयालयाच्या प्राचार्यांना कळविण्यात यावे आणि काम पूर्ण करुन घेण्यात यावे.

Mr Bonkar

29/11

(कृमाप)

**४. वेबपोर्टलवर अदयाप नोंदणी झाली नसलेल्या महाविदयालयांकरीता -**

सन २०२१-२२ हया वर्षात विदयापीठाशी नव्याने संलग्नित असलेल्या तथापि एमआयएस वेबपोर्टलवर अदयाप नोंदणी झाली नसलेल्या महाविदयालयांची नोंदणी वेबपोर्टलवर करुन घेणे आवश्यक आहे. या अनुषंगाने संबंधित महाविदयालयांशी पत्र व दूरध्वनीव्दारे संपर्क साधून वेबपोर्टलवर नोंदणी करण्यात यावी. तसेच सन २०२१-२२ यावर्षात बंद असलेली अथवा असंलग्नित असलेली (De-affiliate) महाविदयालयांची यादी संचालनालयास सादर करण्यात यावी. सदरील महाविदयालये सिस्टिममधून डिॲफिलेट करण्यात येतील ज्यामुळे संबंधित महाविदयालयांकडे माहिती भरण्याबाबत पाठपुरावा करण्याची आवश्यकता राहणार नाही.

**तसेच उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त ज्या महाविदयालयांना २०२०-२१ पुर्वीची/मध्ये मान्यता मिळालेली आहे, परंतु अद्यापही त्यांनी आपल्या महाविदयालयाची नोंद (रजिस्ट्रेशन),उच्च शिक्षण संचालनालयाच्या वेबपोर्टलवर केलेली नाही अशा सर्व महाविद्यालयांनी तसेच अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) च्या वेबपोर्टलवर रजिस्ट्रेशन/नोंदणी केलेली आहे, परंतु उच्च शिक्षण संचालनालयाच्या वेबपोर्टलवर नोंदणी केलेली नाही अशा उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त विद्यापीठांनी/महाविदयालयांनी, उच्च शिक्षण संचालनालयाच्या www.dhemis.maharashtra.gov.in या वेबपोर्टल नोंदणी/रजिसट्रेशन करुन, दिनांक ३० नोव्हेंबर २०२१ या संदर्भ दिवसाची प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची माहिती वेबपोर्टलवर नोंदविणे अनिवार्य आहे.**

**५. महाविदयालयांची माहिती प्राप्त झालेबाबतचे प्रमाणपत्र देणेबाबत -**

सर्व महाविदयालयांकडुन वेबपोर्टलवर अचूक व वैध माहिती विहित मुदतीत नोंदवून घेण्याकरीता विदयापीठामार्फत संनियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. **या अनुषंगाने एमआयएस वेबपोर्टलवर माहिती भरलेल्या महाविदयालयांचीच कामे (उदा. संलग्नीकरण, परीक्षानिकाल व अनुषंगिक कामे) विदयापीठातील इतर शाखा/विभागामार्फत पुढील कार्यवाहीकरीता स्विकारली जावीत.** याबाबत संबधित शाखेच्या प्रमुखांना कळविण्यात यावे. याकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

महाविदयालयांनी सन २०२१-२२ ची माहिती व्यवस्थितरित्या नोंदल्याचे तसेच ती पडताळून बरोबर असल्याचे प्रमाणपत्र संबंधित महाविदयालयाच्या प्राचार्यांकडुन घेण्यात यावे. सदरील प्रमाणपत्राची एक प्रत संचालनालयास वरील ई-मेलव्दारे सादर करण्यात यावी. **महाविदयालयांकडुन प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर विदयापीठाच्या एमआयएस नोडल अधिका-यांनी सदरील माहितीची पडताळणी करुन संबंधित महाविदयालयास सन २०२१-२२ च्या माहिती नोंदणीचे काम पूर्ण केल्याबाबतचे आणि महाविदयालयाची विदयापीठातील इतर शाखा/विभागांशी संबंधित असलेली अथवा वर नमूद केलेली कामे स्विकारण्यास हरकत नसल्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र दयावे. पडताळणी केलेल्या माहितीमध्ये विसंगती आढळल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत नोडल अधिकाऱ्याची/विदयापीठ नोडल अधिकाऱ्याची राहील याची कृपया नोंद घ्यावी.**

**विदयापीठाच्या एमआयएस नोडल अधिका-यांचे माहिती नोंदणीचे प्रमाणपत्र संबंधित महाविदयालयाने सादर केल्यानंतर विदयापीठातील इतर शाखा/विभाग यांचेकडुन संबंधित महाविदयालयाची वर नमूद केलेली कामे पुढील कार्यवाहीसाठी स्विकारण्यात यावीत.** ज्यामुळे महाविदयालयांकडुन केल्या जाणा-या माहिती नोंदणीच्या कामावर योग्य सनियंत्रण राखणे शक्य होईल. वरील दोन्ही प्रमाणपत्राचा नमुना सोबत जोडला आहे.

**(डॉ.प्रकाश बच्छाव)**
**शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य पुणे**

**प्रत -**

१) स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विदयापीठ, नांदेड.
२) उत्तर महाराष्ट्र विदयापीठ, जळगांव.
३) शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर.
४) सोलापूर विदयापीठ, सोलापूर

(क्रमाप)

५) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ, औरंगाबाद.
६) संत गाडगेबाबा अमरावती विदयापीठ, अमरावती.
७) कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविदयालय, रामटेक जि.नागपूर
८) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विदयापीठ, मुंबई
९) मुंबई विदयापीठ, मुंबई.
१०) सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ, पुणे.
११) गोंडवाना विदयापीठ, गडचिरोली.
१२) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विदयापीठ, नागपूर
१३) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ, नाशिक
१४) महाराष्ट्र राष्ट्रीय विधी/कायदा विद्यापीठ,मुंबई.
१५) महाराष्ट्र राष्ट्रीय विधी/कायदा विद्यापीठ,नागपूर.
१६) महाराष्ट्र राष्ट्रीय विधी/कायदा विद्यापीठ, औरंगाबाद.
१७) गोखले अर्थशास्त्र संस्था, डेक्कन जिमखाना, पुणे
१८) टिळक महाराष्ट्र विदयापीठ, गुलटेकडी, पुणे
१९) डेक्कन अभिमत विदयापीठ, येरवडा, पुणे
२०) भारती विदयापीठ, पुणे, भारती भवन, लालबहादूर शास्त्री रस्ता, पुणे
२१) सिंबायोसिस विश्वविदयालय (अभिमत विद्यापीठ), सेनापती बापट रोड, पुणे.
२२) डॉ.विश्वनाथ कराड एम.आय.टी.वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी,पुणे.
२३) संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर.
२४) सिंबायोसिस स्कील व ओपन विद्यापीठ,पुणे -मुंबई एक्सप्रेस,किवळे, पुणे-४१२१०१.
२५) डी.वाय.पाटील,इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी,सेक्टर २९,प्राधीकरण आकुर्डी,पुणे-४४.
२६) स्पायसर ॲडवेन्टीस्ट युनिव्हर्सिटी ( Spicer Adventist University)औंध रोड,गणेशखिंड,पोस्ट,पुणे-४११००७.
२७) छत्रपती शिवाजी महाराज युनिव्हर्सिटी ,पनवेल,मुंबई-४१०२०६.
२८) विश्वकर्मा विद्यापीठ,पुणे.
२९) संदिप विदयापीठ, त्रयंबक रोड, नाशिक, महाराष्ट्र ४२२२१३.
३०) अंजिक्य डी.वाय.पाटील,लोहगांव,पुणे.
३१) एमआयटी आर्ट, डिझाईन ॲन्ड टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी, लोणी कॅम्पस, लोणी काळभोर, पुणे
३२) अमिटी युनिव्हर्सिटी, (Amity University Mumbai) मुंबई-पुणे एक्सप्रेस,भाटन,सोमाटणे,पनवेल मुंबई-४१०२०६.
३३) जी.एच.रायासोनी विद्यापीठ,अमरावती.
३४) फ्लेम युनिव्हर्सिटी, लवळे (Flame University) मुळशी,पुणे-४२.
३५) विजयभूमी विदयापीठ,कर्जत रायगड-१०.
३६) सोमैया विद्याविहार विदयापीठ,मुंबई-७७.
३७) एम.जी.एम. विदयापीठ,औरंगाबाद-०३.
३८) डॉ.होमी भाभा स्टेट विदयापीठ,मुंबई.-३२
३९) श्री.बालाजी विदयापीठ,पुणे.
४०) डि.वाय.पाटील. विदयापीठ, अंबी, तळेगाव दाभाडे,पुणे-०७.

**(महाविदयालयांकडुन माहिती भरल्याबाबत प्राप्त करावयाचे)**

**-: प्रमाणपत्र :-**

प्रमाणित् करण्यात येते की, माहिती व्यवस्थापन प्रणाली (एम.आय.एस) सन २०२१-२२ या वेबपोर्टलवर ------------------------------------------------------------ हया महाविदयालयाची शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची सर्व माहिती नोंदविली आहे. सदरील माहितीची पडताळणी करण्यात आली असून ती बरोबर व वैध असल्याचे आढळून आले आहे. त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी आहे.

(स्वाक्षरी)
प्राचार्य
महाविदयालयाचे नांव व सील

दिनांक

ठिकाण -

---

**(महाविदयालयांना विदयापीठाकडुन दयावयाचे ना- हरकत प्रमाणपत्र )**

**-: प्रमाणपत्र :-**

प्रमाणित करण्यात येते की, माहिती व्यवस्थापन प्रणाली (एम.आय.एस) सन २०२१-२२ या वेबपोर्टलवर ------------------------------------------------------------ हया महाविदयालयाची शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची सर्व माहिती नोंदविली आहे. महाविदयालयाकडे कोणतीही माहिती प्रलंबित नाही. सबब सदरील महाविदयालयाची कामे विदयापीठाच्या संबंधित शाखेकडुन पुढील कार्यवाहीकरीता स्विकारण्यास हरकत नाही.

दिनांक -

ठिकाण

विदयापीठ नोडल अधिकारी
माहिती व्यवस्थापन प्रणालीकरीता
(विदयापीठाचे नांव)